**लॉटरी वगैरे योजनात भाग घेण्यासाठी रक्कम पाठविणे**
**ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. २ (जुलै २७, २००१)**
**भारतीय रिझर्व बँक**
**विनिमय नियंत्रण विभाग**
**मध्यवर्ती कार्यालय**
**मुंबई ४०० ००१**

ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. २

जुलै २७, २००१

प्रति,
विदेशी चलनांचे सर्व अधिकृत डिलर्स
माननीय महोदय

**लॉटरी वगैरे योजनांत भाग घेण्यासाठी रक्कम पाठविणे**

आमच्या असे निदर्शनास आले आहे कि, काही समुद्रपार संघटना भारतातील व्यक्तिंना त्यांनी लॉटरी वगैरेत बक्षीसे जिंकली आहेत आणि त्यांनी काही रक्कम युएस डॉलरमध्ये शुल्क म्हणून पाठविण्याची व्यवस्था करावी असे कळवीत आहेत.

२. अधिकृत डिलर्सचे लक्ष भारत सरकारच्या अधिसूचना जी.एस.आर. ३८१(इ) दिनांकित मे ३, २००० ला अनुसूचि १ च्या बाब ३ कडे वेधण्यात येत आहे ज्या अन्वये, इतर बाबींबरोबरच, लॉटरी तिकीटांच्या खरेदीसाठी रक्कम पाठविण्यास मनाई करण्यात आली आहे. **म्हणून अधिकृत डिलर्सना असे कळविण्यात येत आहे कि, त्यांनी सामान्य जनतेला योग्य प्रकारे अशी सुचना द्यावी कि, लॉटरी योजनांमध्ये भाग घेण्यासाठी रक्कम पाठविण्यास विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ अधीन मनाई आहे. त्या पुढे, ही बंधने मनी सर्क्युलेशनसारख्या लॉटरीसदृष्य योजनांमध्ये भाग घेण्यासाठी, किंवा बक्षीसाची रक्कम वगैरे प्राप्त करण्यासाठी रक्कम पाठविण्यास ही मनाई लागू आहे.**

३. या परिपत्रकात समाविष्ट असलेले आदेश विदेशी विनिमय व्यवस्थापन आधिनियम. १९९९ च्या कलम १० (४) आणि कलम ११(१) अधीन निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशांचा कोणत्याहि प्रकारे भंग करणे वा ते न पाळणे हे या अधिनियमाच्या अधीन दंडनीय आहे.

आपला विश्वासू
के. जे.उदेशी
मुख्य महाव्यवस्थापक